**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महेश शिवाजी पाटील
रा. पाटील भजनी मंडपाजवळ,
उरण इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इस्लामपूर नगरपरिषद, ता. वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३७ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. महेश शिवाजी पाटील
रा. पाटील भजनी मंडपाजवळ,
उरण इस्लामपूर, ता.वाळवा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
(सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. बी.एच.धेंडे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इस्लामपूर नगरपरिषद, ता. वाळवा, जि.सांगली डॉ.सुनिल लक्ष्मणराव लहाने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.२.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

इस्लामपूर नगर परिषदेने बांधलेल्या शॉपिंग सेंटरमधील गाळयांच्या लिलावाच्या संदर्भातील माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद, ता. वाळवा यांच्याकडे मागितली होती. गाळयांच्या लिलावात भ्रष्टाचार झाल्यामुळे तो उघडकीस येऊ नये म्हणून जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी अपील अंशतः मान्य केले व पंधरा दिवसांत माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांना दिले. तरीही माहिती देण्याबाबत टाळाटाळ केली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. महेश शिवाजी पाटील यांनी केली.

श्री. पाटील यांनी सात वर्षांच्या कालावधीतील माहिती विशिष्ट नमुन्यात मागितली होती. त्यांनी नमूद केलेल्या विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करून देणे शक्य नव्हते. त्यामुळे सर्व कागदपत्रे निरीक्षणासाठी उपलब्ध असल्याचे विहित मुदतीत त्यांना कळविले होते, त्यानुसार ते आले नाहीत. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या निर्णयानुसार श्री. पाटील यांच्या अर्जानुसार माहिती तयार करण्यात येऊन देऊ केली असता त्यांनी ती स्वीकारली नाही. त्यामुळे पोस्टाचा दाखला घेऊन त्यांना माहिती निःशुल्क पाठविली. कोणतीही माहिती नाकारलेली नाही, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी लेखी निवेदनाद्वारे केले. त्याचा पुनरूच्चार विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद डॉ. सुनिल लक्ष्मणराव लहाने यांनी पूरक कागदपत्रांसह केला.

अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनाबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, इस्लामपूर नगरपरिषद यांनी विहित मुदतीत कळविले आहे. त्यानुसार त्यांनी अभिलेख अवलोकन करून आवश्यक माहिती प्राप्त करून घ्यावयास हवी होती.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. 15 JUN 2010**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णांत रामचंद्र शेळके
मु.शेळकेवाडी, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,
आदर्श माध्यमिक विद्यालय, शेळकेवाडी, ता.जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६१ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णांत रामचंद्र शेळके
मु.शेळकेवाडी, ता.जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सातारा प्रतिनिधी श्री.एस.जे.जंगम

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक,<br>आदर्श माध्यमिक विद्यालय, शेळकेवाडी, ता.जि.सातारा श्री.एस.एम.शेळके | |

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.९.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.११.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.११.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मान्यतापत्र दिल्यानंतर शाळा कशा पध्दतीने चालविली जाते, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आदर्श माध्यमिक विद्यालय, शेळकेवाडी, ता.जि.सातारा यांनी विहित मुदतीत अपेक्षेनुसार दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.कृष्णांत रामचंद्र शेळके यांनी केली.

आदर्श माध्यमिक विद्यालय, शेळकेवाडी, पो.सोनगाव, जि.सातारा या शाळेस विनाअनुदान तत्त्वावर शासनाने मान्यता दिली असून गेल्या ११ वर्षात कोणतेही अनुदान मिळालेले नाही. तरीही उपलब्ध असलेली माहिती दिली व राहिलेली माहिती सोबत आणली आहे. मात्र उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने श्री.भास्करराव शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ (रीट पिटीशन क्र.५२९४/२००८, दि.२८.४.२००९) या प्रकरणी दिलेल्या निर्णयाप्रमाणे आपल्या शाळेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक श्री.श्री.एस.एम.शेळके यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.एस.जे.जंगम यांनी त्यांच्या निवेदनास दुजोरा दिला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निर्णयानुसार विनाअनुदानित शाळेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसतानाही माहिती देण्याबाबत मुख्याध्यापक यांनी घेतलेली भूमिका उल्लेखनीय आहे. मूळ उत्तराच्या अनुषंगाने अपीलकर्त्यांनी अतिरिक्त प्रश्न व खुलासा याची मागणी केली आहे, ते योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
16 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. सोमनाथ अरूण भोसले<br>मु.पो. अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी, पंचायत समिती,<br>माळशिरस, ता. माळशिरस, जि.सोलापूर | उत्तरवादी |
| **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत खंडाळी,<br>ता. माळशिरस, जि. सोलापरू | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ६६४ / २०१० / सोलापूर |
| २ | **सुनावणीची तारीख** | २०.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. सोमनाथ अरूण भोसले<br>मु.पो. अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | विस्तार अधिकारी, पंचायत समिती,<br>माळशिरस, ता. माळशिरस, जि.सोलापूर<br>श्री. एस. जे. पाटील |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | ग्रामसेवक, ग्रामपंचायत खंडाळी,<br>ता. माळशिरस, जि. सोलापूर<br>श्री. जे. एम. माने |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

ग्रामपंचायतीने केलेल्या तीन वर्षांच्या काळातील निधीच्या विनियोगाची माहिती विलंबाने व अपुरी दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. सोमनाथ अरूण भोसले यांनी केली.

श्री. भोसले यांच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती विस्तृत असूनही विहित मुदतीत व नि:शुल्क दिली. कर्जाच्या पावत्यांच्या छायांकित प्रती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर यांनी दिले, तसेच अतिरिक्त माहितीची मागणी श्री. भोसले यांनी केली. देऊ केलेली माहिती त्यांनी स्वीकारली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडाळी, ता. माळशिरस श्री. जे. एम. माने यांनी केले. देऊ केलेल्या माहितीच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तीन वर्षांच्या काळातील सरसकट स्वरूपाची व ढोबळ अशी आहे. ते लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडाळी, ता. माळशिरस यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे. अपीलकर्त्याने नेमकेपणाने माहिती मागितल्यास कार्यवाही अधिक सुलभ होईल, याची जाणीव अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत खंडाळी, ता. माळशिरस यांनी सोबत आणलेली माहिती स्वीकारल्याची पोहच अपीलकर्त्याच्या स्वाक्षरीसह दर्शविणाऱ्या पत्राची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, खंडाळी, ता. माळशिरस यांनी सुनावणीच्या दिवशी आयोगाला सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. 22 JUN 2010**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. अशोक बाळकृष्ण चांडवले
मु.तळेवाडी, पो.करगणी, ता.आटपाडी, जि. सांगली .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सांगली जि. सांगली .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, आटपाडी, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६७१ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. अशोक बाळकृष्ण चांडवले
मु.तळेवाडी, पो.करगणी, ता.आटपाडी, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सांगली जि. सांगली तर्फे श्री. एस.एम. साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक,
भूमि अभिलेख, आटपाडी, जि. सांगली श्री. एस.एम. साळुंखे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.५.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

गट नं.१२९, १३१, १६३, १६४ व सर्व्हे क्रमांक २८ व २५८ चे गट नकाशे व फाळणी नकाशे आपण मागितले होते, त्यातील फाळणी नकाशे मिळाले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अशोक बाळकृष्ण चांडवले यांनी केली.

श्री. चांडवले यांच्या अर्जानुसार मागणी केलेले गट क्रमांक गट नकाशामध्ये नव्हते, तसेच फाळणी नकाशे उपलब्ध नव्हते. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमिअभिलेख, सांगली यांच्या आदेशानुसार संबंधित सर्व्हे क्रमांकाची मोजणी करून मोजणी नकाशा तयार करून नमूद नसणारे गट त्यामध्ये बसवून नकाशा तयार करून त्याची नक्कल अपीलकर्त्यास दिली. जमीन एकत्रिकरण योजनेनंतरच्या नकाशातील उणीव दुरूस्तीबाबत वरिष्ठ कार्यालयाकडे अर्ज करून त्यांच्या परवानगी-नंतर मूळ नकाशात दुरूस्ती करून अपीलकर्त्यास तीही नक्कल पुरविण्यात आली, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, आटपाटी, जि. सांगली श्री. एस.एम. साळुंखे यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तरीही जन माहिती अधिकारी श्री. एस.एम. साळुंखे व अपिलीय प्राधिकारी श्री. महेश शिंदे यांनी तशी कार्यवाही केली आहे, हे उल्लेखनीय आहे. या पार्श्वभूमीवर माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्त्याने करणे योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 15 JUN 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती वत्सला वसंत खांडेकर
मु.डोंबाळवाडी (कुरबावी),
पो.शिंदेवाडी, ता.माळशिरस,
जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
नीरा उजवा कालवा विभाग, फलटण,
जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**<br>नीरा उजवा कालवा विभाग, फलटण, जि.सातारा<br>श्री.यू.डी.मोरे<br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**<br>पुणे पाटबंधारे मंडळ,<br>पुणे यांचे प्रतिवादी श्री.व.रा.थोरात | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** फाटा क्र.३९ पैकी डोंबाळवाडी मायनर दारे क्र.टेल, सर्वेक्षण क्र.५९साठी दिलेल्या नमुन्यात क्र.७ ची छायाप्रत व तदनुषंगीक एकूण ७ मुद्दे |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती वत्सला वसंत खांडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३/०६/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'मला माहिती अधिकाराखाली केलेल्या मागणीनुसार संपूर्ण माहिती मिळाली असून आता माझे समाधान झाले आहे. माझी कसलीही तक्रार राहिलेली नाही. तरी माझा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा', असे अपीलकर्त्या श्रीमती खांडेकर यांचे दि.२२/०६/२०१० चे निवेदन उप कार्यकारी अभियंता, नीरा उजवा कालवा विभाग, फलटण यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुधीर अच्युतराव देशमुख
मु.पो.आटपाडी,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
लघु पाटबंधारे (स्था.स्त.),
उप विभाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,**
लघु पाटबंधारे (उच्च स्तर),
उपविभाग जत,
जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८३/२०१०/सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०/०५/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी,**<br>लघु पाटबंधारे (उच्च स्तर),<br>उपविभाग जत,<br>जि.सांगली श्री.म.सु.लोंढे | |

| | |
|---|---|
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००५ ते २००९ या कालावधीत लघु पाटबंधारे उपविभाग (स्था.स्त.) या कार्यालयामार्फत सर्वेक्षण केलेल्या कामांची सविस्तर व सांक्षाकित माहिती |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सुधीर अच्युतराव देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२०/०५/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. 'अपील क्र.६८३/२०१०/सांगली याबाबतची माहिती मला आज दि.२६/०६/२०१० रोजी मिळाली', असे अपीलकर्ता श्री.देशमुख यांचे दि.२६/०६/२०१० चे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे (उच्च स्तर), उपविभाग जत, यांनी दि.३०/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्रीमती जनाबाई सिद्राम व्हनमोरे
मु.माडग्याळ, ता. जत, जि. सांगली — अपीलकर्त्या

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत
ता. जत, जि. सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी माडग्याळ,
ता. जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत<br>ता. जत, जि. सांगली श्रीमती वर्षा शिंगण पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मंडल अधिकारी माडग्याळ,<br>ता. जत, जि. सांगली श्री. एम. पी. संकपाळ | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ६ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

**<u>विवेचन</u>**

राज्य माहिती आयोगाने दि. ११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

सहहिस्सेदारांना नोटिसा बजावल्याशिवाय नोंद करण्यात आली असून त्याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, माडग्याळ, ता. जत यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती जनाबाई सिद्राम व्हनमोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात व निवेदनात केली आहे.

श्रीमती व्हनमोरे यांना अर्जाचे उत्तर विहित मुदतीत दिले. हक्क पत्रातील नोंद कशा प्रकारे झाली याची माहिती दिली आहे. संबंधित व्यवहारात सहहिस्सेदारांना नोटिसा दिलेल्या नाहीत, हेही त्यांना कळविले. श्रीमती व्हनमोरे यांची मुख्य मागणी अभिलेखातील नोंद दुरूस्त करून मिळण्याची आहे, त्याप्रमाणे उपविभागीय अधिकारी, मिरज उपविभाग यांनी दि. १३.७.२००९ च्या पत्रान्वये पुनर्विलोकनासाठी आदेश दिले असून चौकशीचे काम चालू आहे, त्यामुळे तात्काळ निर्णय घेण्याची कार्यवाही करीत आहोत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जत, जि. सांगली श्रीमती वर्षा शिंगण पाटील यांनी केले. अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली असून प्रशासकीय कार्यवाहीबाबत प्रक्रिया सुरू आहे, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्त्याच्या मागणीनुसार अधिकार अभिलेखातील नोंदीच्या दुरूस्तीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जत यांच्या निवेदनानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मंडल अधिकारी, माडग्याळ, ता. जत यांनी दि. २.७.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 15 JUN 2010

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. मारूती महादेव सूर्यवंशी<br>वेस रोहिदास चौक, मु.पो. मिरज, जि. सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | नगर रचनाकार, सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, सांगली | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | उपायुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड महानगरपालिका, सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ६८५ / २०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | २६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. मारूती महादेव सूर्यवंशी<br>वेस रोहिदास चौक, मु.पो. मिरज, जि. सांगली |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | नगर रचनाकार, सांगली, मिरज आणि<br>कुपवाड महानगरपालिका, सांगली<br>श्री. राजकुमार डिगंबर मठपती |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | उपायुक्त, सांगली, मिरज आणि<br>कुपवाड महानगरपालिका, सांगली<br>श्री. एस. बी. गोसावी |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

एका आर्किटेक्टसंबंधीची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांनी

दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी त्यांनी केली नाही. संबंधित आर्किटेक्टने केलेल्या बांधकामाच्या नकाशाची व आर्किटेक्टच्या परवान्याची प्रत दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. मारूती महादेव सूर्यवंशी यांनी केली.

अपीलकर्ता श्री. सूर्यवंशी यांनी एका आर्किटेक्टच्या संदर्भातील सरसकट माहिती कालावधी नमूद न करता 'आजपर्यंत जे घडले याची माहिती' अशा स्वरुपात मागितली होती. अभिलेख अवलोकनासाठी त्यांना विहित मुदतीत कळविले होते. अपिलीय प्राधिकाऱ्यांनीही श्री. सूर्यवंशी यांच्याकडून काम व वर्ष या बाबतचा नेमका तपशील घेण्याचे आदेश दिले होते. त्यांनी मागणी केलेले नकाशे अत्यंत मोठ्या आकाराचे असून त्याच्या प्रती तयार करून घेतल्या आहेत. अन्य माहिती पूर्वी दिली असून नकाशाच्या प्रती आता देत आहोत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा नगररचनाकार, सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली श्री. राजकुमार डिगंबर मठपती यांनी केले.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्याची माहितीची मागणी विशिष्ट व्यक्तीच्या व्यवसायासंदर्भातील सरसकट स्वरूपाची आहे, ही बाब नोंद घेण्याजोगी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जनाबाई सिद्राम व्हनमोरे
मु.पो.माडग्याळ, ता.जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती अरूणा ईटाई

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, जत, ता.जत, जि.सांगली श्री.व्ही.एस.गेजगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.५.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.६.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२०१० रोजी घेण्यात आली.

दारिद्र्यरेषेखालील यादीच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्रीमती जनाबाई सिद्राम व्हनमोरे यांनी मागितली होती. ती माहिती पूर्ण देण्यात आली. यादीत त्रुटी असल्याची सौ.व्हनमोरे यांची तक्रार असून दुरूस्ती करण्याची त्यांची मागणी होती. आपल्या कार्यालयाला तसे अधिकार नसल्यामुळे सक्षम अधिकाऱ्याकडे तसा प्रस्ताव पाठवून त्या प्रस्तावाच्या प्रतींसह माहिती सौ.व्हनमोरे यांना दिली. माहिती मिळाली असून कोणतीही तक्रार नाही असा जबाब सौ.व्हनमोरे यांनी दि.७.५.२०१० रोजी पंचासमक्ष दिला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, जत, ता.जत. जि.सांगली श्री.व्ही.एस.गेजगे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत, ता.जत. जि.सांगली श्रीमती अरूणा इटाई यांनी केले. सौ.व्हनमोरे यांच्या जबाबाची प्रत त्यांनी सादर केली. अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि त्यानुसार प्रशासकीय कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जत, ता.जत. जि.सांगली यांनी केली आहे, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
15 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संतोष शंकर चौधरी
मु.पो.कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
माढा, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.मा.ना.खेडकर

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.आर.एस.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.११.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३१.१०.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२.११.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००७ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.११.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.संतोष शंकर चौधरी यांनी कुर्डुवाडीतील एकत्रिकरण ेजनेनंतरच्या गट नकाशाची प्रत मिळण्याची मोघम स्वरूपात मागणी केली होती. शुल्क कळवून नकाशा तयार ठेवून त्यांना दाखविला असता, आपल्याला अपेक्षित असलेले गट क्रमांक त्यात नमूद नसल्यामुळे नकाशा नको असल्याचे त्यांनी सांगितले व संबंधित गट क्रमांक नोंदवून देण्याची मागणी केली. अशा प्रकारची दुरूस्ती करण्याचे अधिकार आपल्या कार्यालयाला नाहीत. त्यासाठी उपसंचालक, भूमी अभिलेख, पुणे यांच्याकडे रीतसर अर्ज करणे आवश्यक असल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर अर्ज न करता त्यांनी थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. अभिलेखात आहे त्या स्वरूपात देऊ केलेली माहिती अपीलकर्त्यास नको असून प्रशासकीय कार्यवाहीची त्यांची मागणी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.आर.एस.शिंदे यांनी केले.

अपीलकर्त्यास मूळ मागणीबाबत उत्तर देण्यास झालेला विलंब लक्षात घेता त्यांचा मूळ अर्ज अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पुढील कार्यवाहीसाठी संबंधित अर्ज अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर कार्यालयाने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांच्याकडे दि.९.४.२०१० च्या पत्रान्वये पाठविल्याचे आयोगास अवगत केले. 'मूळ कुर्डुवाडी गावचा सर्व्हे नंबरचा नकाशा, त्यानंतर जमीन एकत्रिकरण योजनेत तयार केलेला गटाचा नकाशा व त्यालगतचे तयार केलेले एकत्रिकरण योजनेतील अभिलेखाची सविस्तरपणे पडताळणी करण्यात यावी. अपीलकार यांचे मूळ जमीनीचा सर्व्हे नंबर व त्यास जमीन एकत्रिकरण योजनेत कायम

केलेला गट क्रमांक खात्री करण्यात यावेत. अपीलकार यांचा जमीन एकत्रिकरण योजनेत गट क्रमांक कायम करूनही नकाशात दर्शविले नसतील तर ते नकाशात नमूद करण्याकामी जरूर ते प्रस्ताव तयार करून तात्काळ सादर करण्यात यावे,' असे अधीक्षक, भूमी अभिलेख, सोलापूर यांनी दि.९.४.२०१० च्या पत्रान्वये तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माढा, ता.माढा, जि. सोलापूर यांना निर्देशित केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांनी अधीक्षक, भूमी अभिलेख, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि.३०.७.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. राजेंद्र नामदेव साबळे
वर्षा निवास, साठे नगर, आटपाडी, जि. सांगली .. अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, चर्चरोड, पुणे-१ .. उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, चर्चरोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६९५ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | २१.५.२०१० |

३. **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, चर्चरोड, पुणे-१ श्री. पी. एस. वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक (शिक्षण),
समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, चर्चरोड, पुणे-१ श्री. अरूण बमनोटे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.५.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि.२१.५.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

शासकीय वसतीगृहातील वॉर्डन, स्वयंपाकी आदींच्या संदर्भातील सुमारे १० वर्षांपूर्वीची माहिती अपीलकर्ता श्री. राजेंद्र नामदेव साबळे यांनी मागितली होती. माहिती जुनी असल्यामुळे त्यांच्या मागणीप्रमाणे कार्यसूची मिळत नव्हती, ती नव्याने तयार करून दिली. या प्रक्रियेमुळे माहिती देण्यास (दि. ५.४.२००८, दि. ६.६.२००८ व दि. १६.१२.२००८ ) विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (शिक्षण), समाजकल्याण संचालनालय, पुणे श्री. अरूण बमनोटे यांनी केले.

जन माहिती अधिकारी तथा उप संचालक (शिक्षण), समाजकल्याण संचालनालय, पुणे यांनी कार्यसूची नव्याने तयार करून दिली असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते. तसेच या संदर्भात वेळोवेळी अपीलकर्त्याशी त्यांनी पत्रव्यवहार केला असल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. 22 JUN 2010

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शशिकांत सोनाजीराव जगताप
बी/४०२, अनुसया इनक्लेव्ह, जगताप चौक,
वानवडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली
ता. हवेली, जि. पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली
ता. हवेली, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ६.४.२०१० |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली<br>ता. हवेली, जि. पुणे श्री. व्ही. पी. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली<br>ता. हवेली, जि. पुणे श्री. जगदीश ह. निंबाळकर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.६.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.८.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९३० मध्ये मिळकतीवर नाव नोंदविताना वारसांना नोटिसा काढल्या होत्या का याबाबत वारंवार माहिती मागूनही ती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. शशिकांत सोनाजीराव जगताप यानी केली. आपल्या अर्जातील मुद्दा क्र. ४ हा प्रशासकीय कामकाजाचा भाग असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २च नुसार माहिती अधिकारांतर्गत समावेश होत नाही, असे चुकीचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी दिले, असे अपीलकर्ता श्री. जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात म्हटले आहे.

श्री. जगताप यांच्या अर्जातील पहिल्या दोन मुद्दयांची माहिती त्यांना दिली. मुद्दा क्र.३ ची माहिती ८० वर्षांपूर्वीची असून शोध घेऊनही उपलब्ध झाली नाही, तसेच मूळ विषयाबाबत मंडल अधिकारी यांच्याकडून चौकशी केली असून त्याचा अहवाल प्राप्त होताच त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश ह. निंबाळकर यांनी केले.

संबंधित कागदपत्रे ८० वर्षांपूर्वीची असली तरी त्यातील कायम स्वरुपी जतनाच्या कागदपत्रांचा अधिक शोध घेतला जाणे आवश्यक आहे. तसेच मंडल अधिकारी यांच्यामार्फत केलेल्या चौकशीचा अहवाल अपीलकर्त्यास त्वरित उपलब्ध करून दिला पाहिजे. मुद्दा क्र. ४ बाबत जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री. जगदीश ह. निंबाळकर यांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. उपलब्ध कागदपत्रानुसार संबंधित मुद्दयाचे उत्तर देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी संबंधित प्रकरणातील कायम स्वरूपी जतनाच्या अभिलेखाचा अधिक शोध घेऊन त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

३. मूळ प्रकरणी मंडल अधिकारी यांच्यामार्फत केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पुरवण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली यांनी आयोगास सादर करावा.

४. वरील अ. क्र. २ व ३ ची पूर्तता जन माहिती अधिकारी यांनी दि. ३०.६.२०१० पर्यंत करावी.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 22 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत नारायण वसगडेकर
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड, गावभाग, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, संलग्न
जमाबंदी आयुक्त कार्यालय, (भूमापन), पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३९ / २०१० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, संलग्न
जमाबंदी आयुक्त कार्यालय, (भूमापन), पुणे प्रतिनिधी श्रीमती आशा जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.महेश शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.१.२०१० |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१.२०१० |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.२.२०१० |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.८.२.२०१० |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण नगरभूमापन अधिकारी, सांगली यांना पाठविलेल्या नोटिशीबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांनी मागविलेल्या अहवालाची प्रत अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांच्याकडून मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. शशिकांत नारायण वसगडेकर यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली.

श्री.वसगडेकर यांच्या अर्जावर चारच दिवसात उत्तर दिले. संबंधित नोटिशीची प्रत श्री.वसगडेकर यांनी जिल्हाधिकारी, सांगली यांना पाठविली होती. पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी ती नगरभूमापन अधिकारी, सांगली यांच्याकडे योग्य त्या सूचनांसह पाठवून तसे श्री.वसगडेकर यांना आपल्या कार्यालयाने कळविले. दि.१२.१.२०१० रोजीच्या या नोटिशीला नगरभूमापन अधिकारी, सांगली यांनी दि.१०.२.२०१० रोजी उत्तर दिले. ही माहिती श्री.वसगडेकर यांना देण्यात आली आहे, मात्र अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनीच चौकशी करावी व त्यांनीच अहवाल सादर करून तसे उत्तर द्यावे अशी श्री.वसगडेकर यांची मागणी आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली यांनी केले. श्री.वसगडेकर यांनी केलेल्या अर्जावरील व प्रथम अपिलाच्या सुनावणीची कार्यवाही पूर्ण होण्याआधीच त्यांनी आयोगाकडे अपील केले असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.महेश शिंदे यांनी नमूद केले. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
15 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.इरगोंडा शिवगोंडा बाळीकाई
शिखनिळा भवन, वॉर्ड नं.६, शिवानुभैव मंडपाजवळ,
मंगळवार पेठ, जत, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
जत, ता.जत, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४३+९१३ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.४.२०१० दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.इरगोंडा शिवगोंडा बाळीकाई
शिखनिळा भवन, वॉर्ड नं.६, शिवानुभैव मंडपाजवळ,
मंगळवार पेठ, जत, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती वर्षा शिंगण

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
जत, ता.जत, जि.सांगली श्री.प्रतिनिधी श्री.बी.एम.सवदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.७.२००८ (अ.क्र.७४३+९१३) |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.६.७.२००८ (अ.क्र.७४३+९१३) |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.८.२००८ (अ.क्र.७४३+९१३) |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१५.९.२००८ (अ.क्र.७४३)<br>दि.१२.१२.२००८ (अ.क्र.९१३) |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.३.२००९ (अ.क्र.९१३) व दि.१६.१२.२००८ (अ.क्र.७४३) रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी अ.क्र.९१३ मध्ये कोणीही उपस्थित राहिले नसल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली. तसेच अ.क्र.७४३ मध्ये त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.४.२०१० रोजी घेण्यात आली.

सन १९८५ मध्ये आपण घेतलेल्या भूखंडावरील शेतसारा वसूल केला. सन २००२ पासून शेतसारा बंद झाला. त्यानंतर गाव कामगार तलाठी यांनी केलेली नोंद मंडल अधिकारी यांनी रद्द केली. शेतसारा कशाच्या आधारे वसूल केला, मूळ जमीन मालकाच्या वारसांच्या दाव्यात न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रत आदी माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.इरगोंडा शिवगोंडा बाळीकाई यांनी केली.

संबंधित भूखंडाची खरेदीखतात नोंद नाही. गावकामगार तलाठ्यांनी चुकीच्या पध्दतीने सारा वसूल केला. परंतु जमिनीला मूळ मालकाचे नाव कमी न झाल्यामुळे तत्कालीन तलाठ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर तेव्हापासून सारा वसुली बंद करण्यात आली. मूळ जमीन मालकाच्या वारसांमधील न्यायालयीन प्रक्रियेचा आदेश गावदप्तरी नाही. त्यामुळे त्याची प्रत देता आली नाही. अन्य सर्व माहिती दिलेली आहे. चुकीच्या नोंदीबाबतच्या त्यांच्या तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे महसूल नियमावली अंतर्गत अपील चालू आहे, असे प्रतिपादन जन माहिती

अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली श्री.बी.एम.सवदे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जत, ता.जत, जि.सांगली श्रीमती वर्षा शिंगण यांनी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे व तशी त्यांची पोहोच दप्तरी आहे. त्यांनी उपस्थित केलेले अन्य मुद्दे महसूल नियमावली अंतर्गत प्रशासकीय कार्यवाहीचे आहेत. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ते निर्णयार्थ येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
1·6 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

| | | |
|---|---|---|
| श्री. बसवेश्वर बाळासो कोष्टी<br>द्वारा महाकाली झेरॉक्स सेंटर, मु.पो.ता. कवठे महांकाळ,<br>जि. सांगली | | अपीलकर्ता |
| **विरूध्द** | | |
| **जन माहिती अधिकारी तथा** | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>कवठेमहांकाळ, जि. सांगली | उत्तरवादी |
| **अपिलीय प्राधिकारी तथा** | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली | |

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | ७४४ / २०१० / सांगली |
| २ | **सुनावणीची तारीख** | २६.५.२०१० |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. बसवेश्वर बाळासो कोष्टी<br>द्वारा महाकाली झेरॉक्स सेंटर, मु.पो.ता. कवठे महांकाळ,<br>जि. सांगली |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>कवठेमहांकाळ, जि. सांगली श्री. एस. एस. चौधरी |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली<br>तर्फे प्रतिनिधी श्री. जे. पी. शिंदे |
| ४ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

पतसंस्थांनी करावयाच्या व्याज आकारणी संदर्भात सन २००५ पूर्वीचे शासकीय परिपत्रक आपण मागितले असता सन २००६ नंतरचे परिपत्रक दिले. आपल्या पत्रावर तहसीलदारांनी धनलक्ष्मी सहकारी पतसंस्थेबाबत दिलेल्या आदेशाची प्रत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी

संस्था, कवठेमहांकाळ यांनी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. बसवेश्वर बाळासाो कोष्टी यांनी केली.

श्री. कोष्टी व धनलक्ष्मी सहकारी पतसंस्था यांच्यामध्ये न्यायालयात वाद चालू आहे. त्या अनुषंगाने ते सातत्याने अर्ज व माहितीची मागणी करीत असतात. उपलब्ध परिपत्रके, पोटनियम, पत्रव्यवहार आदींची प्रत त्यांना दिली आहे. तहसीलदारांचे आदेश नसून पत्र आहे, त्याची प्रतही दिली आहे. श्री. कोष्टी एका अर्जाच्या उत्तरातील माहितीच्या अनुषंगाने माहिती मागणारे नवे अर्ज असे सातत्याने करीत असतात. असे २५ अर्ज त्यांनी केले आहेत.एकाच व्यक्तीला एकाच विषयातील अशी माहिती पुरविणे यंत्रणेला ताणाचे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री. एस.एस. चौधरी यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांचे प्रतिनिधी श्री. जे. पी. शिंदे यांनी त्याला दुजोरा दिला.

आपल्याला अपेक्षित असलेल्या प्रशासकीय कार्यवाहीसाठी मुद्दयातून पोट मुद्दे उपस्थित करून २५/२५ अर्ज करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. आवश्यक असल्यास सर्व अभिलेखाचे अवलोकन करून संपूर्ण माहिती ते एकदा प्राप्त करून घेऊ शकतात. तथापि सन २००० ते २००५ या काळातील पतसंस्थेच्या व्याज आकारणी संदर्भातील शासकीय परिपत्रकांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कवठेमहांकाळ, जि.सांगली यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 23 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ